नागरी पथविक्रेत्यांना सहाय्य या घटकांतर्गत प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी राज्यस्तरीय मान्यता समिती नेमण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.११९/नवि-२०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २२ ऑगस्ट, २०१९

वाचा :- आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे पत्र क्र. दि.अं.या.-रा.ना.उ.अ./SUSV/का.१६/२०१८-१९/२०४७, दिनांक ३०.०६.२०१८

प्रस्तावना :-

दिनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत, नागरी पथविक्रेत्यांना सहाय्य, या उपांगाचा समावेश होतो. सदर उपांगामध्ये नागरी पथविक्रेत्यांचा बाजाराच्या गरजेच्या आधारावर कौशल्याचा विकास करून, त्यांच्या उपजीविकेचा दर्जा उंचावण्यावर भर देण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने पथविक्रेता सर्वेक्षण करणे, त्यांना ओळखपत्र देणे, शहर पथविक्रेता आराखडा विकसित करणे, पथविक्रेता क्षेत्रासाठी आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास करणे, त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन, त्यांचा आर्थिक विकास करणे हे उपांगाचे उद्दीष्ट आहे.

०२. केंद्र शासन परस्कृत दिनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत नागरी पथविक्रेत्यांना सहाय्य या घटकाच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी राज्यस्तरीय मान्यता समिती स्थापन करण्याबाबत सूचना केलेल्या आहेत. त्यानुसार, मा.प्रधान सचिव (नवि-२) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय मान्यता समिती स्थापन करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत, नागरी पथविक्रेत्यांना सहाय्य या उपांगांर्तगत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त प्रस्तावांना मंजुरी देण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय मान्यता समितीची स्थापना करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकारी / पदाधिकारी	पदनाम
१.	प्रधान सचिव, नगर विकास विभाग - २	अध्यक्ष
२.	अपर मुख्य सचिव, नियोजन यांचे प्रतिनिधी	सदस्य
३.	प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम	सदस्य
४.	संचालक, नगर रचना विभाग, पुणे	सदस्य
५.	केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय यांचे प्रतिनिधी	सदस्य
६.	नागरी पथविक्रेता संघटनेचा प्रतिनिधी	सदस्य
७.	राज्य अभियान संचालक तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय	सदस्य सचिव

राज्यस्तरीय मान्यता समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील :-

- सदरची समिती ही राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाच्या नगारी पथविक्रेत्यांना सहाय्य या उपांगार्तगतील मार्गदर्शक सुचनानुसार, कार्य करेल.
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त पथविक्रेत्यांना सर्वेक्षण प्रस्ताव, शहर पथविक्रेता नियोजन आराखडा तयार करण्यासाठीच्या सल्लागार / यंत्रणाची निवड करणे, शहर पथविक्रेता नियोजन आराखडयास मंजुरी देणे.
- उपलब्ध बाजारपेठेच्या पायाभूत सुधारणासाठीच्या प्राप्त प्रस्तावांना मंजुरी देण्याची कार्यवाही सदर समिती करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्यांचा संगणक संकेतांक २०१९०८२३१२४३२१८५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shankar
Trambak Jadhav

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=65f3f4695111ee4b72455e21ef9099788d9b999ffbcaaa070711f14d2a10e138, serialNumber=c83ebbb277c2e72c85231b87f684c424a13c398a4f921b6d167a8c859e9817f5, cn=Shankar Trambak Jadhav
Date: 2019.08.23 12:53:22 +05'30'

(शंकर त्र्यं. जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. प्रधान सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई-३२.
४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
५. निवडनस्ती (नवि-२०).